बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १६९ वा | शुक्रवार दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीसांची अवैध मद्य विरोधी कारवाई विविध ठिकाणी करण्यात आली असून नळदुर्ग अपोलीस ठाणे अंतर्गत बाळु रा. बाभ्ळगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.०९.०९.२०२५ रोजी १८.३० वा. सु ईटकळ येथे महाराष्ट्र चिकन दुकानाच्या बाजूस अंदाजे ४,२०० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

अंबी अपोलीस ठाणे अंतर्गत रामभउ रा. चिंचपुर खु. ता. परंडा जि. धाराशिव हे दि.१०.०९.२०२५ रोजी शेळगाव येथील जाधव वस्ती येथे हॉटेल शिवनेरीच्या पाठीमागे अंदाजे ८४० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १२ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५(ई) अन्वये अंबी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान लोहारा पोलीसांनी दि.१०.०९.२०२५ रोजी लोहारा पो ठाणे हद्दीत लोहारा येथील जेवळी ते कानेगाव जाणारे रोडच्या कडेला नगरपालीकेच्या मोकळ्या जागेत पत्राचे शेड मध्ये छापा टाकला. यावेळी आरोपी नामे-हुजुर अब्दुल शेख, लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव हे १४.२० वा. सु. लोहारा येथील जेवळी ते कानेगाव जाणारे रोडच्या कडेला नगरपालीकेच्या मोकळ्या जागेत पत्राचे शेड मध्ये कल्याण मटका जुगाराचे साहित्य एकुण २६० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले लोहारा पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२ (अ) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### लॉकर तोडून सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रकमेची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी रागिनी खंडू जाधव, वय ४० वर्षे, रा. धनलक्ष्मी कॉलनी एकोंडी रोड उमरगा यांचे राहते घराचे कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.३१.०८.२०२५ रोजी कापून आत प्रवेश करुन घरातील कपाटातील लॉकर तोडून सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम ५,००० असा एकुण ३१.३०० किंमतीचा माल चोरुन नेला.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-रागिनी जाधव यांनी दि.१०.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१ (३), ३३१(४), ३०५(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## गोवर व रूबेला लसीकरण मोहिमेचे शंभर टक्के यश सुनिश्चित करा- जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार



धाराशिव, (जिमाका)- जिल्ह्यातील सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित आश्रमशाळांमधील ५ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांना गोवर व रूबेला प्रतिबंधक लसीची मात्रा देण्यासाठी १५ ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे.या मोहिमेचे शंभर टक्के यश सुनिश्चित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दिले.

या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ४ सप्टेंबर रोजी सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक,आरोग्य सहाय्यक व आशा स्वयंसेवक यांची कार्यशाळा घेण्यात आली.मोहिमेचे उद्दिष्ट शंभर टक्के गाठावे,अशा सूचना देण्यात आल्या असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतिष हरिदास यांनी सांगितले.

राज्यातील काही आश्रमशाळांमध्ये अलीकडेच गोवरचे रुग्ण आढळल्याने ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व आश्रमशाळांमधील पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना लस देण्यात येणार असून,यासाठी आरोग्य विभागामार्फत लसीकरण सत्रे आयोजित केली जातील.तसेच विशेष लसीकरण पथके स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ.कुलदीप मिटकरी यांनी दिली.

लसीकरण मोहिमेत आरोग्य विभागाबरोबर महिला व बालविकास,शिक्षण आणि समाजकल्याण विभागांनी समन्वयाने कार्य करावे,हलगर्जीपणा करू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी श्री. पुजार यांनी दिले.

नागरिकांना वेळेवर व उत्तम आरोग्य सेवा मिळावी,यासाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकुरकर व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतिष हरिदास यांनी केले.

## जिल्ह्यात ७ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई चार परवाने निलंबित,३ केंद्रांना सक्त ताकीद

धाराशिव(जिमाका) रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागामार्फत नियमितपणे कृषी सेवा केंद्रांची तपासणी करण्यात येत आहे.या तपासणीत अनियमितता आढळल्याने जिल्ह्यातील ७ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आली आहे.त्यापैकी ४ सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले असून ३ केंद्रांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

तपासणीदरम्यान ई-पॉस मशीनप्रमाणे साठा न जुळणे, परवान्यात नमूद नसलेल्या स्रोतांकडून खरेदी-विक्री करणे,साठा रजिस्टरमध्ये नोंद नसणे,शेतकऱ्यांना विहित नमुन्यात पावती न देणे,खरेदी बिले नसणे,परवान्यात गोदामाचा समावेश नसणे इत्यादी अनियमितता आढळून आल्या. कारवाई झालेल्या केंद्रांमध्ये धाराशिव तालुक्यातील २,लोहारा १,भूम १, परंडा १ व वाशी तालुक्यातील ३ सेवा केंद्रांचा समावेश आहे.यापूर्वी खरीप हंगामात जिल्ह्यातील ४३ कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आली होती. कृषी विभागाने स्पष्ट केले आहे की,तपासणी पुढेही सुरू राहणार असून दोषी विक्रेत्यांवर बियाणे,खते व कीटकनाशके कायद्यांतर्गत कठोर कारवाई केली जाईल.

शेतकऱ्यांनी कृषी निविष्ठा खरेदी करताना अधिकृत परवानाधारक सेवा केंद्रातूनच खरेदी करावी. खरेदीवेळी पक्की पावती घेऊन त्यावरील तपशील,विक्रेत्याची स्वाक्षरी तपासावी.अनुदानित खत खरेदी करताना ई-पॉस मशीनवरून मिळणारे बिल घ्यावे.खताच्या पिशवीवरील किंमत व बिलातील दर तपासावा.

बियाण्यांची पिशवी सिलबंद असल्याची खात्री करावी व टॅग, पिशवी,थोडे बियाणे हंगामभर जतन करावे. नामांकित कंपनीचेच बियाणे, खते व कीटकनाशके खरेदी करावीत. प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एम.के.आसलकर यांनी शेतकऱ्यांना योग्य जागरूकता बाळगण्याचे आवाहन केले आहे.

## ३० सप्टेंबरपर्यंत अनुसूचित जाती विद्यार्थ्यांचे प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढण्याचे आदेश

धाराशिव (जिमाका)- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत महाडीबीटी ऑनलाईन प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शिष्यवृत्तीचे अर्ज विद्यार्थी तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत.या स्थितीबाबत समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण व परीक्षा शुल्क परतावा,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ महाडीबीटी प्रणालीद्वारे मिळतो.मात्र अनेक अर्ज प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीतील प्रलंबित अर्ज ३० सप्टेंबर २०२५ अखेर अनिवार्यपणे निकाली काढावेत,असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.विहीत मुदतीत अर्ज निकाली न काढल्यास संबंधित अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्याची राहील, असा इशारा समाज कल्याण विभागाने दिला आहे.

याबाबत गांभीर्याने लक्ष घ्यावे,असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री.सचिन कवले यांनी केले आहे.

## जुगार विरोधी कारवाई

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान नळदुर्ग पोलीसांनी दि.०९.०९.२०२५ रोजी नळदुर्ग पो ठाणे हद्दीत ईटकळ चौकात डी. आर. टेलर दुकाना समोर छापा टाकला. यावेळी सय्यद रा. निलेगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव हे १७.३० वा. सु.ईटकळ चौकात डी.आर. टेलर दुकानासमोर कल्याण मटका जुगाराचे साहित्य एकुण २,१८० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले नळदुर्ग पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## कळंब येथून स्वयंपाकाची गॅसची टाकी व रोख रकमेची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नंजविनी शिवराम बिडवे, वय ६५ वर्षे, रा. पापडे गल्ली, कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.०८.०९.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील एच पी कंपनीची गॅस टाकी व रोख रक्कम १०,०००असा एकुण १३,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-संजविनी बिडवे यांनी दि.१०.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१ (३), ३०५(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## ठाकरे नगर नवरात्र महोत्सव २०२५ कार्यक्रम व महिला कार्यकारणी जाहीर कार्यक्रमाची सर्व जबाबदारी महिला शक्तीकडे



धाराशिव (प्रतिनिधी) - शहरातील ठाकरे नगर नवरात्र महोत्सव २०२५ च्यावतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षी श्री देवीजींच्या मुर्तीची व घटस्थापना स्थापना शुक्रवार दि.२२ सप्टेंबर रोजी करण्यात येणार आहे. त्यासाठी ठाकरे नगर येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत सविस्तर चर्चा करून विविध जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. तसेच विधीवत घटस्थापना, किर्तन, दांडिया, खेळ पैठणीचा, मेहंदी स्पर्धा, गालीचा रांगोळी प्रशिक्षण, रांगोळी स्पर्धा, डान्स स्पर्धा व राजस्थान येथील डॉक्टरांच्या टीमचे सलग सहा दिवस फिजिओथेरपी आरोग्य उपचार शिबिर यामध्ये डायबेटीस, बीपी ल गुडघे दुखी यावर उपचार करण्यात येणार आहेत. तर नामवंत गायकांची आराधी गीते सादर होणार आहेत. या विविध धार्मिक कार्यक्रमासह दि.२४ ते ३० सप्टेंबर दरम्यान फिजिओथेरपी उपचार करण्यात येणार आहेत.

ठाकरे नगर येथे घेण्यात आलेल्या बैठकीस मुख्य आयोजक संस्थापक अध्यक्ष देवी भक्त प्रशांत उर्फ बापू साळुंके यांच्या मातोश्री आणि या महोत्सवाच्या मुख्य आधारस्तंभ श्यामल साळुंके आदींसह २०० महिलांची प्रमुख उपस्थिती होती. याबाबत अधिक माहिती देताना साळुंके म्हणाले की, नवरात्र महोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि आरोग्य विषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवानिमित्त कळंब तालुक्यातील येरमाळा येथील श्री येडेश्वरी देवी मंदिरातून धाराशिव येथील ठाकरे नगरमध्ये शुक्रवार दि.२२ सप्टेंबर रोजी देवींची ज्योत पायी आणण्यात येणार आहे. तर आदी शक्ती पिठातील देवींच्या मंदिरातील धानाचे वाण आणून घटस्थापना नायब तहसिलदार.... यांच्या हस्ते विधिवत पूजा अर्चा करुन करण्यात येणार असल्याची माहिती ठाकरे नगर नवरात्र महोत्सवचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत उर्फ बापू साळुंके यांनी दिली आहे.

तसेच या बैठकीत मंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सौ सुरेखाताई खांडेकर यांच्यावर तर उपाध्यक्षपदी सौ प्रतिभा गाडे व सचिवपदी सौ सत्यशिला गायकवाड तसेच मिरवणूक प्रमुख म्हणून सौ योजना सलगर, सौ पूजा वाघमारे यांची तर रांगोळी प्रमुख सौ सुरेखा पवार, सौ योगिता निलंगे यांची व आरती नियोजनाची जबाबदारी सौ दीपाली गायकवाड यांच्यावर तर भोगी प्रमुख म्हणून सौ मिनाक्षी महामुनी, सौ सत्यभामा खोत तसेच देवी आणण्याची जबाबदारी सौ रेखा शिंदे यांच्या खांद्यावर दिली आहे. तर स्पर्धा प्रमुख म्हणून सौ लता राठोड व सौ कोमल कदम या काम पाहणार असून महाप्रसादाचे नियोजन सौ रुक्मिणी सुर्यवंशी सीमा कदम या करणार आहेत. तसेच होम विधी नियोजन सौ इंदू जगताप, सौ सत्यशिला गायकवाड, सौ उषा गायकवाड व सौ राणी माळी या पाहणार आहेत. तर दांडिया प्रमुख म्हणून सौ अरुणा झरकर व सौ राणी माळी या जबाबदारी निभावणार आहेत. तसेच आराधी गीत प्रमुख म्हणून विमल साठे व सौ देडे ताई यांची टीम विविध पारंपरिक देवी गीते सादर करणार आहेत. तर कुंकू मार्चनची जबाबदारी सौ अनिता पवार व सौ अनारकली शिंदे यांच्यावर सोपवली आहे. तसेच मिरवणूक प्रमुख म्हणून सौ सीमा कदम, सौ वर्षा डोके, सौ निकिता सिरसट, सौ शितल कसपटे, चौधरी व सौ अनिता शेंडगे या निभावणार आहेत. तर फराळाच्या नियोजनाची जबाबदारी सौ उषा गायकवाड व सौ मिनाक्षी महामुनी यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यामुळे या कार्यक्रमास जास्तीत जास्त भाविक व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशांत उर्फ बापू साळुंके यांनी केले आहे.

## गुरुवर्य के.टी.पाटील सर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबीर



धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक १० सप्टेंबर रोजी के. टी.पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय येथे गुरुवर्य के.टी.पाटील सर यांच्या जयंतीनिमित्त के.टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग, के.टी. पाटील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड मॅनेजमेंट, के.टी. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड टेकनॉलॉजि, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव व शासकीय आयुर्वेद महाविद्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराच्या सुरुवातीस डॉ. उमेश आगवणे (सहाय्यक प्राध्यापक शिबीर प्रमुख शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय धाराशिव) यांनी संत गाडगे बाबा व गुरुवर्य के. टी. पाटील सर यांच्या प्रतिमेचे पूजन केले . सदर शिबिराचे उदघाटन संस्थेच्या सरचिटणीस सौ. प्रेमाताई पाटील तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.आदित्य (भैय्या) पाटील यांनी फीत कापून केले .रक्तदान शिबिराची सुरुवात श्री.आदित्य (भैय्या) पाटील यांच्या रक्तदानाने करण्यात आली .

यावेळी शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील डॉ. उमेश आगवणे (सहाय्यक प्राध्यापक शिबीर प्रमुख शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय), डॉ. शीतल बनसोडे (सहयोगी प्राध्यापक स्वस्थवृत्त विभाग), डॉ.परमेश्वर राऊत ( प्राध्यापक अगदतंत्र विभाग), डॉ. श्रीराम रगड (सहयोगी प्राध्यापक, पंचकर्म विभाग), डॉ. श्रुती तारापूरे (सहयोगी प्राध्यापक,कायाचिकित्सक विभाग), श्री.अमोल गडवलकर (प्रयोगशाळा तंत्रज्ञ), श्री.भालेराव (मिश्रक) हे उपस्थित होते. तसेच शासकीय रक्तपेढीतील डॉ. दीपमाला करंडे (रक्तसंक्रमण अधिकारी जिल्हा शासकीय रुग्णालय), श्री. गणेश साळुंके (वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक), श्री.अविनाश रणखांब (रक्तपेढी तंत्रज्ञ), कु. जानराव नीलाक्षी (रक्तपेढी तंत्रज्ञ) श्री.नामदेव मुंढे (सुश्रुषा अधिकारी), श्री.रविराज गंभीर (रक्तपेढी सहाय्यक) व त्यांचे सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल जोशी यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना असे सांगितले कि, रक्तदानामुळे बहुमोल मानवी जीव वाचवण्याचे श्रेय मिळते. तसेच निस्वार्थ बुद्धीने सेवा करणाऱ्या रक्तदात्याचा अभिमान वाटतो. हे मानवतेचे कार्य असेच चालू ठेवावे. बहुसंख्य रक्तदात्यांनी रक्तदानाचे योगदान दिले.

मोफत आरोग्य तपासणी शिबिरात अनेक विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.आरोग्य तपासणी शबीरमध्ये उंची, वजन, रक्तदाब, मधुमेह, रक्तगट,हिमोग्लोबीन, इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. आरोग्य तपासणी शिबिरामध्ये १९७ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. तसेच गरजूंवरती मोफत उपचार करण्यात आले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.रामराजे उंबरे यांनी मोलाचे सहकार्य केले तसेच रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.अतुलकुमार अलकुंटे ,उपकार्यक्रमाधिकारी प्रा.शिवरत्न खरे, प्रा.पल्लवी हंगरगेकर, प्रा. फैझान हुसेन, स्वयंसेवक ,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

